**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ११/२०१७ मध्ये निशाणी क्र. ३४ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे त्याच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक १६/०६/२०२५ रोजी पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन वादी क्र. ४ रामचंद्र ढगाले यांना उलटतपासास सामोरे जाण्यास व प्रस्तुत प्रकरणात पुरावा देण्यास परवानगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास प्रतिवादींचे म्हणणे घेण्यात आले आहे. प्रतिवादी क्र. १ तर्फे दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जातील नमूद कारणे संयुक्तीक नाहीत. वादी हा उलटतपासासाठी गैरहजर राहिला असल्याने न्यायालयाने वादीचा पुरावा बंद केल्याचा आदेश पारीत केला आहे व त्यामुळे अर्ज नामंजूर करावा व अर्ज मंजूर करावयाचे झाल्यास रुपये ५,०००/– इतकी कॉस्ट करण्यात यावी.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) प्रतिवादीच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादी क्र. ४ रामचंद्र ढगाले हा त्याच्या प्रतिवादींतर्फेच्या उलटतपासकामी न्यायालयात हजर राहिला नसल्याने वादीचा पुरावा बंद करण्यात आल्याबाबत दिनांक १६/०६/२०२५ रोजी निशाणी क्र. १ वर आदेश पारीत केला आहे. त्यानंतर वादीने दिनांक १२/०९/२०२५ रोजी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. वरील नमुद बाबी विचारात घेता व प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते वादींनी प्रतिवादी क्र. १ ला खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर वादी क्र. ४ रामचंद्र ढगाले यांना उलटतपासास सामोरे जाण्याची व त्यांचा पुढील

पुरावा सादर करण्याची संधी देऊन प्रस्तुत प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निकाली काढणे न्यायाचे व उचित आहे. त्यामुळे वरील नमूद कारणांमुळे माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज खर्चाच्या अटीवर मंजूर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) वादींनी प्रतिवादी क्र. १ ला रुपये ५००/– (रुपये पाचशे) इतकी खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो व त्यानुसार निशाणी क्र. १ वर दिनांक १६/०६/२०२५ रोजी वादींविरुध्द पारीत केलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन वादी क्र.४ रामचंद्र ढगाले यांना उलटतपासास सामोरे जाण्यास व वादींना पुढील पुरावा सादर करण्यास परवानगी देण्यात येते.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2025.09.26 15:39:21 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– २६/०९/२०२५ — २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.